## <u>परिपत्रक २९७ ३१-१-२००१</u>

विषय :- मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम
१९५१ चा नियम ७ अ नुसार अधिकारांचा
वापर करणेसंबंधी

या कार्यालयाचे परिपत्रक ८ दिनांक २४ मार्च, १९५२ व परिपत्रक २२६ दिनांक १० नोव्हेंबर १९७८ कडे या संघटनेतील धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचे लक्ष वेधण्यांत येत आहे. परिपत्रक क्रमांक ८ दिनांक २४ मार्च १९५२ मध्ये संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्था/मंडळे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २(१३) नुसार हया सार्वजनिक न्यास म्हणून नोंदणी होणे बंधनकारक/आवश्यक असल्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच परिपत्रक २२६ दिनांक १० नोव्हेंबर १९७८ मध्ये जेव्हा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची नोंद करण्यासाठी कलम १८ खाली अर्ज करण्यात आल्यानंतर चौकशी अधिकाऱ्यांनी (धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त) विवक्षित चौकशी करण्यापूर्वी कोणती कार्यवाही करावी याची रीत मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ चा नियम ७ अ मध्ये घालून दिलेली आहे.

धर्मादाय संघटनेच्या मराठवाडा विभागातील विभागीय कार्यालयाचे निरिक्षण करताना असे निदर्शनास आलेले आहे की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २(१३) नुसार नोंदणी करण्याच्या चौकशीत अर्जदाराने जाहीर नोटीस वृत्तपत्रांमध्ये दिली म्हणून पूर्तता न केल्या अभावी अशी प्रकरणे दप्तरी दाखल करण्यात आलेली आहे. वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस दिली नाही म्हणून सदर प्रकरणे दप्तरी दाखल करणे उचित व योग्य वाटत नाही. त्यासाठी अन्य रीतीने जसे ७ अ ची नोटीस दवंडी पिटवून किंवा सदर नोटीस कार्यालयाच्या सूचना फलकावर लावून तसेच संस्थेच्या/मंडळाच्या कार्यालयाच्या एखाद्या ठळक भागावर अशा नोटीशीची प्रत चिटकवून, तसेच अर्जदार वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देण्याचा खर्च सोसण्याच्या परिस्थितीत आहे की नाही, विश्वस्त व्यवस्थेची खर्च देण्याची क्षमता अर्जदाराची आर्थिक स्थिती किंवा संबंधित प्रकरणातील हितसंबंधाचे स्वरुप या सर्वाचा नैसर्गिक न्यायालया धरुन (Natural Justice) विचार करुन विवक्षित नोंदणीपूर्वीची चौकशी पूर्ण करता येते.

मराठवाडा विभागातील सर्व विभागीय कार्यालयांना पुढीलप्रमाणे निर्देशन देण्यात येत आहे की, सर्व धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्तांनी सार्वजनिक न्यास नोंदणी करताना मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ चा नियम ७ अ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा उपयोग करताना नैसर्गिक न्यायाचा (Natural Justice) दृष्टीकोन समोर ठेवून स्थावर मालमत्ता (मिळकत) नसलेल्या तसेच अतिशय अल्प प्रमाणात जंगम मिळकत असलेल्या किंवा जंगम मिळकत निरंक असणाऱ्या अशा प्रकरणामध्ये अर्जदारांना वृत्तपत्रामध्ये नोटीस देणे आर्थिकदृष्टया परवडत नसेल असे आढळून आल्यास वृत्तपत्रात नोटीस देण्याऐवजी मुंबई

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ चा नियम ७ अ (३) मध्ये नमुद केलेल्या इतर रितीने नोंदणीपूर्वीची चौकशी करावी व प्रलंबीत नोंदणी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत.

तसेच सर्व विभागीय कार्यालयानी देखील वरीलप्रमाणे सूचनांचे पालन करुन त्यांचेकडील प्रलंबित असलेली कलम १८ ची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढली असे निर्देशन देण्यात येत आहे.

धर्मादाय आयुक्त (प्र.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक